## L. A. BILL No. LXII OF 2023.

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA SLUM AREAS (IMPROVEMENT, CLEARANCE AND REDEVELOPMENT) ACT, 1971.

## सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६२.

**महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

१९७१ चा महा. २८.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौ-याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

एचबी २६८७-१

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ३ई ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१, याच्या कलम ३ई मधील, पोट-कलम (१) मध्ये " दहा वर्षे " हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या दोन्ही ठिकाणी त्याऐवजी, " पाच वर्षे " हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल.

१९७१ चा महा. २८.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (१९७१ चा महा. २८) याच्या कलम ३ई मध्ये अशी तरतूद केली आहे की, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेखाली व्यक्तींना गाळ्यांचे वाटप झाल्याच्या दिनांकापासून सुरू होणा-या पहिल्या दहा वर्षांच्या कालावधीत ती गाळेधारक व्यक्ती, वाटप झालेल्या गाळ्याचे हस्तांतरण करणार नाही आणि उक्त दहा वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर गाळेधारकाला झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या परवानगीने अशा गाळ्याचे विहित पद्धतीनुसार हस्तांतरण करता येईल.

**२.** गाळेधारकांकडून केल्या जाणा-या अशा गाळ्यांच्या हस्तांतरणावर घातलेल्या निर्बंधाचा उक्त कालावधी खूपच मोठा आहे, याबाबत शासनाला अनेक निवेदने प्राप्त झालेली आहेत. तसेच, अशा गाळ्यांच्या अवैध हस्तांतरणाच्या समस्यांमध्ये देखील वाढ झाली आहे. म्हणून, उक्त दहा वर्षांचा कालावधी पाच वर्षांपर्यंत कमी करणे इष्ट आहे असे शासनाला वाटते. त्या प्रयोजनाकरिता, उक्त अधिनियमाच्या कलम ३ई मध्ये यथोचित सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

**३.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

नागपूर,
दिनांक १९ डिसेंबर, २०२३.

**अतुल सावे,**
गृहनिर्माण मंत्री.

**सन २०२३ चे वि. स. विधेयक क्रमांक ६२ महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३ याचे परिशिष्ट.**

[ **महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ यातील उतारे** ]

(सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८)

**१.** ते **३.** * * * *

३ अ. ते ३ड. * * * *

३ई. (१) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेखाली व्यक्तींना गाळ्यांचे वाटप झाल्याच्या तारखेपासून सुरू होणा-या पहिल्या १० वर्षांच्या कालावधीत ती गाळेधारक व्यक्ती वाटप झालेल्या गाळ्याचे विक्री, देणगी, अदलाबदल, भाडेपट्टा याद्वारे किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करणार नाही. उक्त १० वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर गाळेधारकाला झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या परवानगीने अशा गाळ्याचे विहित पद्धतीनुसार हस्तांतरण करता येईल. गाळ्यांचे हस्तांतरण करण्यावर निर्बंध.

" (२) जर गाळेधारक व्यक्तीने, पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करून गाळ्याचे हस्तांतरण केले तर, सक्षम प्राधिकरण, आदेशांद्वारे, असा गाळा ताब्यात असलेल्या व्यक्तीस, आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने व अशा कालावधीच्या आत अशा गाळ्यातून निष्कासित करण्याचा निदेश देईल, आणि अशा निष्कासनाच्या प्रयोजनार्थ, सक्षम प्राधिकरणास आवश्यक असेल अशा बळाचा वापर करता येईल किंवा वापर करण्याची व्यवस्था करता येईल :

परंतु, या पोट-कलमान्वये कोणताही आदेश देण्यापूर्वी, सक्षम प्राधिकरण अशा व्यक्तीस, त्याला गाळ्यामधून निष्कासित करण्यात का येऊ नये याबाबतची कारणे देण्याची वाजवी संधी देईल.".

३फ. ते ३झ-७ * * * *

**४.** ते **४८.** * * * *

**अनुसूची.** * * * *

# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**[ सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६२. ]**

**[ महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[ श्री. अतुल सावे,**
गृहनिर्माण मंत्री. **]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.